# महाराष्ट्र शासन

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,लिमये वाडी, अलिबाग.जि.रायगड –४०२ २०१

## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG –RAIGAD

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD – 402 201

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch


जा.क्र.शावैमअ/कंत्राटी पदभरती/ ५५२ /२०२३ दिनांक : १७/ ०३ /२०२३

जाहिरात

**Walk in Interveiw**

कर्मचारी संपकालीन परिस्थितीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथे खालील गट-क तांत्रिक व नर्सिंग पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे भरावयाची आहेत. मुलाखत दिनांक २०.०३.२०२३ रोजी दुपारी ०२ वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथे घेण्यात येईल. उमेदवारांने अर्ज व सर्व शैक्षणिक कागदपत्रे व प्रमाणपत्रे (मुळ व एक नक्कल) मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. सदर पदभरती गुणवत्तेनुसार करण्यात येईल. या पदांकरिता रायगड जिल्हयातील स्थानिकांना, अनुभवी, संगणक प्रशिक्षित (MS-CIT) व मराठी/इंग्रजी टायपिंग येणा-या उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल.

रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | पदांचे नाव | शैक्षणिक पात्रता | ठोक मानधन | मुलाखतीचे वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.Sc BPMT/DMLT | नियमानुसार | दिनांक २०.०३.२०२३ रोजी दुपारी ०२.०० ते ०५.०० वाजेपर्यंत |
| २ | अधिपरिचारीका | ANM/GNM | | |
| ३ | वैद्यकीय समाजसेवक (MSW) | MSW | | |
| ४ | सहाय्यक ग्रंथपाल | पदवीधर ग्रंथपाल | | |
| ५ | महिला क्ष-किरण तंत्रज्ञ | B.Sc BPMT/DMLT | | |

सदर पदभरती ही नर्सिंग व तंत्रज्ञ (प्रयोगशाळा व इतर) पदाकरिता असुन ही केवळ संस्थेतील रिक्त पदांकरिता आहे. यांचा नियमित अथवा अस्थायी रित्या भरलेल्या पदांशी कसलाही संबंध नाही.

अटी व शर्ती :

१. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर आदेशाच्या दिनांका पासून २९ दिवसापर्यंत राहील व तांत्रिक खंड देऊन गरजेनुसार पुढे चालु ठेवता येईल.

२. सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदर पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही.

३. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावर तात्पुरती असल्याने कोणतीही नोटीस अथवा कारण न देता उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणुक संबंधित दावा करण्याचा हक्क राहणार नाही, अथवा शासनाकडे अर्ज करता येणार नाही.

४. सदर कालावधीमध्ये काम असमाधानकारक आढळल्यास उमेदवारास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५. अधिष्ठाता कार्यालयातुन वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश उमेदवारास बंधनकारक राहतील.

६. उमेदवारांना अन्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सार्वजनिक सुटटयांचा लाभ मिळेल.

७. उमेदवारांना म.ना.से.नियम १९८१ लागु राहणार आहे.

८. निवृत्ती वेतन, गटविमा योजना, एन.पी.एस. योजना या सारखे व इतर कोणतेही लाभ उमेदवारास मिळणार नाही.

९. रिक्त पदांची संख्या वेळेवर कमी अधिक होऊ शकते. सदरील पदांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्ष पुर्ण इतकी असुन कमाल वयोमर्यादा ही ३८ वर्ष पुर्ण इतकी राहील.

१०. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी वरील नियमित रिक्त पदे बदलीने अथवा सरळसेवेने भरल्यास सदर आदेश आपोआप संपुष्टात येतील.

११. उमेदवारांची सेवा कोणतेही कारण न देता मुदतीपुर्व सामाप्त करण्याचा अधिकार संस्थाप्रमुखांना राहील.

१२. उच्च गुणवत्ताधारक व आवश्यक क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१३. उमेदवाराचे नियमानुसार आवश्यक असल्यास एम.एन.सी. रजिस्ट्रेशन झालेले असले पाहिजे.

१४. उमेदवाराने कोणतीही चुकीची माहिती दिल्याचे उघडकीस आल्यास त्याची नियुक्ती रद्य करण्यात येईल.

१५. उमेदवाराला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१६. वरीलप्रामणे मुलाखतीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने हजर रहावे लागेल. मुलाखतीसाठी पत्राने कळविण्यात येणार नाही.

१७. उमेदवाराने अर्ज ए-४ आकाराच्या को-या कागदावर करावयाचे असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असणे आवश्यक आहे.

अ) अर्ज केलेल्या पदाचे नाव आ) अर्जदाराचे नाव व सही इ) स्वत्:चा सुपुर्ण पत्ता

ई) दुरध्वनी मोबाईल क्रमांक उ) शैक्षणिक अर्हता ऊ) कामाचा अनुभव- संस्थेचे नाव, अनुभव कालावधी ए) शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, संबधित प्रमाणपत्रेख् अनुभव प्रमाणपत्र.

१८. सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल अथवा रदद करण्याची किंवा कोणत्याही वेळी निवड यादी रदद करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील.

नियुक्त उमेदवारांना तात्काळ मंगळवार दिनांक २१.०३.२०२३ रोजी पासुन कर्तव्यावर हजर व्हावे लागेल. रुजु होण्याकरिता कालावधी मिळणार नाही यांची कटाक्षाने नोंद घ्यावी.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रागयङ

सदर जाहिरात संस्थेच्या website-www.gmchalibag.in/gmch प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रत: मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.